२ ५ ऑगस्ट २०२५

# मराठी साप्ताहीक पोलीस पत्रिका
## कार्यालय पोलीस अधीक्षक
## नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर

अ.क.25 दिनांक 16.06.2025 ते 20.06.2025 ७२०६ ( भाग 1 ते 5 )

# भाग —1 (नियुक्ती,निवृत्त,बदली,पदोन्नती)

१)क्रमांक/पोआ/नाजिग्रा/डि-९/पोहवा-१०१३-१२६६/मानीव दिनांक/५९४३/२०२५ दिनांक १५/०७/२०२५

विषय:- मानीव दिनांक मंजूरीबाबत. .

संदर्भ:- शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक कमांक एसआरव्ही-२००२/प्र.क. २/२०२२/१२ दिनांक ६/०६/२००२

-:आदेश:-

उपरोक्त विषयांकित संदर्भान्वये पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण या आस्थापने वरील कार्यरत असलेले पोलीस अंमलदार पोहवा/१०१३ सुरेश नत्थुजी डायरे नेमणूक पोस्टे उमरेड यांना दिनांक १९/११/२०१६ पासुन व पोहवा/१२६६ संजय बबनराव शेंडे, नेमणूक पोलीस मुख्याल,नागपूर ग्रामीण यांनी २१/१०/२०१६ रोजीच्या तारखे पासून पोलीस हवालदार पदाची मानीव दिनांक मंजूर करण्यात यावी असे विनंती अर्जात नमूद केलेले आहे.

शासन तरतुदीनुसार मानीव दिनांकाच्या प्रस्तावाबाबत पोलीस अधीक्षक यांचे स्तरावर आवश्यक ते निर्णय घ्यावा असे नमुद आहे.'' व महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,परिपत्रक क.एसआरव्ही-२००२/प्र.क्र. २/२००२/१२ दि.०६/०६/२००२ सोबतचे परिशिष्ट ''अ'' व ''ब'' च्या परिशिष्टाच्या परिशिष्ट ''ब'' मधील अनु क्र. ४ मध्ये मानीव दिनांक ही एकास-एक तत्वावर देण्यास मान्यता असल्याने ती लागू आहे.

त्याअनुषंगाने या आस्थापनेवरील पोहवा/१०१३ सुरेश नत्थुजी डायरे यांना सफौ/६५३ चक्रधर हेमराजजी बावनकुळे यांची पोलीस हवालदार पदाची दिनांक १९/११/२०१६ व पोहवा/१२६६ संजय बबनराव शेंडे यांना सफौ/७२० चांगदेव महागुजी कुथे यांचे पोलीस हवालदार पदाची दिनांक २१/१०/२०१६ पासून पोलीस हवालदार पादाची पदोन्नती झाल्यामुळे नमुद पोलीस अंमलदार यांना मानीव दिनांक देय असल्याने खालीलप्रमाणे दर्शविल्यानुसार मानीव दिनांक मंजूर करण्यात येत आहे.

( १ )

पोहवा/१०१३ सुरेश नत्थुजी डायरे यांचे सोबत कर्तव्यावर रूजु झालेले सफौ/६५३ चक्रधर हेमराजजी बावनकुळे यांची पोलीस हवालदार या पदोन्नती पदाची मानीव दिनांकाचा लाभ आस्थापना मंडळाने मान्यता दिल्यामुळे खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. क्र. | पोलीस कर्मचा-याचा हुद्दा/ब.क्र./नांव | सद्या देण्यांत आलेल्या पदोन्नतीचा दिनांक | देय असलेल्या पदोन्नतीचा मानीव दिनांक |
|---|---|---|---|
| | | पोलीस हवालदार | पोलीस हवालदार |
| १ | पोहवा/१०१३ सुरेश नत्थुजी डायरे | २६/११/२०२१ | १९/११/२०१६ ( सफौ/६५३ चक्रधर हेमराजजी बावनकुळे यांची पोलीस हवालदार पदाचे पदोन्नतीचे मानीव तारीख ) |
| २ | सफौ/६५३ चक्रधर हेमराजजी बावनकुळे | १९/११/२०१६ | |

(१) अ

पोहवा/१२६६ संजय बबनराव शेंडे,यांचे सोबत कर्तव्यावर रूजु झालेले सफौ/७२० चांगदेव महागुजी कुथे यांची पोलीस हवालदार या पदोन्नती पदाची मानीव दिनांकाचा लाभ आस्थापना मंडळाने मान्यता दिल्यामुळे खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. क्र. | पोलीस कर्मचा-याचा हुद्दा/ब.क्र. /नांव | सद्या देण्यांत आलेल्या पदोन्नतीचा दिनांक | देय असलेल्या पदोन्नतीचा मानीव दिनांक |
|---|---|---|---|
| | | पोलीस हवालदार | पोलीस हवालदार |
| १ | पोहवा/१२६६ संजय बबनराव शेंडे | २६/११/२०२१ | २१/१०/२०१६ ( सफौ/चांगदेव महागुजी कुथे यांची पोलीस हवालदार पदाचे पदोन्नतीचे मानीव तारीख ) |
| २ | सफौ/७२० चांगदेव महागुजी कुथे | २१/१०/२०१६ | |

**२) क्रमांक नाजिग्रा/डि-९(इ)/पदोन्नती-सफौ/५१२३/२०२५ नागपूर, दिनांक १९/०६/२०२५**

## -: आदेश :-

पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामिण नागपूर या आस्थापनेवरील खालील नमूद पोलीस हवालदार यांना सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यात येत असल्याने त्यांना आदेश निर्गमितच्या दिनांका पासून वेतनबॅंड एस-१०, पे मॅट्रीक्स २९२००-९२३००/- या वेतन मध्ये सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदावर त्यांचे सेवाजेष्ठतेनुसार पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा ग्रामीण हया आस्थापनेवरील रिक्त असलेल्या पदावर तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यांत येत असुन ते सध्या नेमणुकीस आहे त्यांच ठिकाणी कार्यरत राहतील.

आदिवासी विकास विभाग, क्र.एमटीसी-१४२०००/प्र.क्र./५३/का.१०, दिनांक २८.५.२००१ तसेच शासन परिपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतीक कार्यालय, विशेष सहाय्यक विभाग क्र. सीबीसी/१०/२००४/प्र.क्र. ५७०/मावक-५ दिनांक ५.०३.२००५ नुसार जात वैद्यता प्रमाणपत्र असल्याशिवाय पदोन्नती देवू नये असे निर्देश दिल्याने ज्या पोलीस अंमलदारांनी आपल्या जातीची वैद्यता प्रमाणपत्र कार्यालयात सादर केलेली आहे अशाच पोलीस अंमलदारांना पदोन्नती देण्यात येत आहे.

खालील नमुद पोलीस हवालदार यांच्यावर संबंधीत पोलीस स्टेशन/शाखेत आजपावेतो विभागीय चौकशी/न्यायालयीन खटले/फौजदारी गुन्हे दाखल असल्यास अशा अंमलदारांना पदोन्नती आदेश तामील न करता त्यांचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करुन पुढील आदेशाची वाट पाहावी. सदरची जबाबदारी संबंधीत प्रभारी अधिकारी यांची राहतील.

तसेच पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक पोमसं/६/२१-से.वा. /संगणक/१०५/२००९,दिनांक ०२/११/२०१९ चे अनुषंगाने दिनांक ३०/११/१९९३ पुर्वी व सध्या सेवेत कार्यरत असलेले वयाचे ५० वर्ष पुर्ण केलेले पोलीस अंमलदार यांना संगणक प्रमाणपत्र सादर करण्यांस सुट देण्यांत आलेले आहे. तसेच शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,परिपत्रक क्रमांक एसआरव्ही २०१७/प्र.क्र.४६२/कार्या.१२ दिनांक ०३/०७/२०१८ अन्वये गट अ ते क संवर्गातील पदावर नियुक्ती/पदोन्नती साठी संगणक हाताळणे/वापरबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्यांत आल्याने प्रमाणपत्र सादर न केल्यास वेतनवाढ रोखणे/पदोन्नती रोखणे यासारख्या कार्यवाही करण्यांचे सर्व विभाग प्रमुख यांना निर्देशीत केलेले आहे.

महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दिनांक ०७/०५/२०२१ अन्वये तसेच मा. उच्च न्यायालयाचे याचिका क्रमांक २७९७/२०१५ व दिनांक ०४/०८/२०१७ रोजी निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतींच्या कोटयातील रिक्त पदे खुला प्रवर्गात दिनांक २५/०५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेच्या स्थितीनुसार केवळ तात्पुरत्या स्वरूपात भरण्यांत यावीत असे निर्देश असल्याने खालील नमुद पोलीस हवालदार यांना सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यांत येत आहे.

| Sr. No | DPC No. | B. NO. | Rank | NAME | CURRENT POSTING | APPOINTMENT DATE | H.C PRAMOTION DATE | APPOINMENT CATEGERY / V.D | PROMOTION CATOGERY |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 34 | 42 | HC | BHARAT CHINDUJI GANVIR | PTS | 01/06/1996 | 28/02/2014 | SC/YES | OPEN |
| 2 | 35 | 473 | HC | PRADEEP BABURAO WASNIK | PHQ | 15/04/1997 | 14/08/2017 | SC/YES | OPEN |
| 3 | 36 | 507 | HC | AMAR KHANDUJI ZINE | DEVLAPAR | 15/04/1997 | 14/08/2017 | SC/YES | OPEN |

पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे अध्यक्षतेखाली पदोन्नती समीतीची बैठक दिनांक १७/०४/२०२५ रोजी घेण्यांत आलेली आहे. त्या बैठकीत वरील पोलीस हवालदार यांना सहायक पोलीस उप निरीक्षक या पदावर पदोन्नती देण्याचे अटी व शर्तीच्या अधीन राहुन तात्पुरत्या स्वरुपात सदर अंमलदार ज्या ठिकाणी आहे. त्या ठिकाणी पदोन्नती देण्यांचे मंजूरी देण्यात आलेली असून नमुद पोलीस अंमलदार यांना तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

**३)क्रमांक. नाजिग्रा/डि-९(इ)/पदोन्नती-पोहवा/५१२४/२०२५ नागपूर दिनांक १९/०६/२०२५**

**-::आदेश::-**

पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामिण नागपूर या आस्थापनेवरील खालील नमूद पोलीस नाईक यांना पोलीस हवालदार या पदावर पदोन्नती देण्यात येत असल्याने त्यांना आदेश निर्गमितीच्या दिनांका पासून वेतनबॅंड एस-९ पे मॅट्रीक्स २६४००-८३६००/- या वेतना मध्ये पोलीस हवालदार या पदावर त्यांचे सेवाजेष्ठतेनुसार पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण हया आस्थापनेवरील रिक्त असलेल्या पदावर तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यांत येत असुन ते सध्याचे नेमणुकीचे ठिकाणीच कार्यरत राहतील.

आदिवासी विकास विभाग, क्र.एमटीसी-१४२०००/प्र.क्र./५३/का.१०, दिनांक २८.५.२००१ तसेच शासन परिपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतीक कार्यालय, विशेष सहाय्यक विभाग क्र. सीबीसी/१०/२००४/प्र. क्र.५७०/मावक-५ दिनांक ५.३.२००५ नुसार जात वैद्यता प्रमाणपत्र असल्याशिवाय पदोन्नती देवू नये असे निर्देश दिल्याने ज्या पोलीस अंमलदारांनी आपल्या जातीची वैद्यता कार्यालयात सादर केलेली आहे अशाच पोलीस अंमलदारांना पदोन्नती देण्यात येत आहे.

खालील नमुद पोलीस नाईक यांच्यावर संबंधीत पोलीस स्टेशन/शाखेत आजपावेतो विभागीय चौकशी/न्यायालयीन खटले /फौजदारी गुन्हे दाखल असल्यास आशा अंमलदारांना पदोन्नती आदेश तामीळ न करता त्यांचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करुन पुढील आदेशाची वाट पहावी. सदरची जबाबदारी संबंधीत प्रभारी अधिकारी यांची राहील.

तसेच पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक पोमसं/६/२१-से.वा. /संगणक/१०५/२००९,दिनांक ०२/११/२०१९ चे अनुषंगाने दिनांक ३०/११/१९९३ पुर्वी व सध्या सेवेत कार्यरत असलेले वयाचे ५० वर्ष पुर्ण केलेले अंमलदार यांना संगणक प्रमाणपत्र सादर करण्यांस सुट देण्यांत आलेले आहे. तसेच शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,परिपत्रक कमांक एसआरव्ही २०१७/प्र.क्र.४६२/कार्या.१२ दिनांक ०३/०७/२०१८ अन्वये गट अ ते क संवर्गातील पदावर नियुक्ती/पदोन्नती साठी संगणक हाताळणे/वापरबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्यांत आल्याने प्रमाणपत्र सादर न केल्यास वेतनवाढ रोखणे/पदोन्नती रोखणे यासारख्या कार्यवाही करण्यांचे सर्व विभाग प्रमुख यांना निर्देशीत केलेले आहे.

महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दिनांक ०७/०५/२०२१ अन्वये तसेच मा.उच्च न्यायालयाचे याचिका क्रमांक २७९७/२०१५ व दिनांक ०४/०८/२०१७ रोजी निर्णया विरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतींच्या कोटयातील रिक्त पदे खुला प्रवर्गात दिनांक २४/०५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेच्या स्थितीनुसार केवळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्यांत यावीत असे निर्देश असल्याने खालील नमुद पोलीस नाईक यांना पोलीस हवालदार या पदावर पदोन्नती देण्यात येत आहे.

| Sr. No | DPC No. | B. NO. | Rank | NAME | CURRENT POSTING | APPONMENT DATE | NPC PRAMOTION DATE | APPOINMENT CATEGERY/ V.D | PROMOTION CATOGERY |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 59 | 709 | NPC | ROSHAN CHAMPAT DHOKNE | TRAFFIC | 14/04/2012 | 29/12/2021 | OPEN | OPEN |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 60 | 646 | NPC | VIPIN ASHOK GAIDHANE | LCB | 14/04/2012 | 29/12/2021 | OBC/YES | OPEN |
| 3 | 61 | 355 | NPC | TUSHAR RAMDAS KUDPALLE | MAUDA | 14/04/2012 | 29/12/2021 | OBC/YES | OPEN |
| 4 | 62 | 241 | NPC | NITESH LAXMINARAYAN ROKDE | KANHAN | 14/04/2012 | 29/12/2021 | OPEN | OPEN |
| 5 | 63 | 703 | NPC | SANTOSH VASANTA RATHOD | KATOL | 14/04/2012 | 29/12/2021 | VJA/YES | OPEN |

पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे अध्यक्षतेखाली पदोन्नती समीतीची बैठक दिनांक १७/०४/२०२५ रोजी घेण्यांत आली. त्या बैठकीत पोलीस नाईक यांना पोलीस हवालदार या पदावर अटी व शर्ती च्या आधीन राहुन नमुद अंमलदार ज्या ठिकाणी आहे. त्या ठिकाणी पदोन्नती देण्यांचे मंजूरी देण्यात आलेली असून नमुद पोलीस अंमलदार यांना तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात येत आहे.

**४)क्रमांकः-पोआ/नाजिग्रा/डी-९(ई)/पो.अंमलदार /कार्यमुक्त/५१२२/२०२५ नागपूर, दिनांक :-१९/०६/२०२५**

**आदेश**

अपर पोलीस महासंचालक, वाहतुक म. रा. मुंबई यांचे आदेश क्र. अपोमसं(वा)/४३/प्रलि/पो.अंमलदार निवड-नागपूर ग्रामिण/१५२/२०१८/२७०१ मुंबई दिनांक २८/०५/२०२५ अन्वये महामार्ग पोलीस विभाग नागपूर करिता या आस्थापने वरील खालील पोलीस अंमलदारांची व चालक पोलीस अंमलदार यांची तात्पुरत्या स्वरूपात अटीवर निवड करण्यांत आलेली आहे. सदर पोलीस अंमलदार यांना प्रतिनियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्याकरिता या आस्थापनेवरून दिनांक १९/०६/२०२५ रोजी माध्यान्हानंतर कार्यमुक्त करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदाराचे नाव, पदनाम व बक्कल नंबर | नेमणुक |
|---|---|---|
| १ | नापोशि/१०७ प्रितेश मानीकराव नारनवरे | पोस्टे. खापरखेडा |
| २ | नापोशि/११३८ होमेश्वर गुनाजी खडसे | पोस्टे.केळवद |
| ३ | नापोशि/२१६१ उमेश शंकराव गुरमुले | पोस्टे. कोंढाळी |
| ४ | नापोशि/५११ अंकुश भाउरावजी शास्त्री | पोस्टे.सावनेर |
| ५ | नापोशि/२१५५ मनोज पुरुषोत्तम आगरकर | पोस्टे. कोंढाळी |
| ६ | नापोशि/९७८ मंगेश गणपत सोनटक्के | पोस्टे. कन्हान |
| ७ | मनापोशि/२१३३ सविता परसराम उईके | पोस्टे.देवलापार |
| ८ | नापोशि/२१४५ गोकुळ गेंदु सलामे | पोस्टे.कुही |
| ९ | मनापोशि/२१२४ रोशनी प्रणव श्रीरसागर | पोस्टे.कळमेशवर |
| १० | मनापोशि/१५७४ मृनाली धनराज चाके | पोस्टे.कन्हान |
| ११ | मनापोशि/१६३६ संगीता गावंडे | स्थानिक गुन्हे शाखा |
| १२ | नापोशि/४७२ विकास हरिभाउ वाईलकर | पोस्टे.काटोल |
| १३ | मनापोशि/१४४६ ममता गंगाधर सरोदे | पोस्टे.सावनेर |
| १४ | नापोशि/३९८ भुषण किसन मदनकर | पोस्टे.काटोल |
| १५ | नापोशि/३०४ किरण वसंतराव वरूडकर | वाहतुक शाखा |
| १६ | नापोशि/८६१ आशिक शामदास कुंभरे | पोस्टे.कन्हान |
| १७ | नापोशि/१३४८ प्रशांत परमेश्वर रंगारी | पोस्टे.कन्हान |
| १८ | नापोशि/६९५ तिलकचंद मिलींद रामटेके | पोस्टे.बोरी |
| १९ | मनापोशि/२१३१ बाली महोनसिंह जाधव | पो.मु |
| २० | नापोशि/२१६० रंजन दयाराम कांबळे | पोस्टे.सावनेर |
| २१ | मनापोशि/८५४ प्रिया देवरावजी महल्ले | पोस्टे.पारशिवनी |
| २२ | नापोशि/२१०५ राहुल बाबुराव तभाने | पोस्टे.पारशिवनी |
| २३ | नापोशि/२१४९ श्रीराम दत्तु डोईफोडे | पोस्टे.मौदा |
| २४ | नापोशि/३७४ गोपाल किसन डोकरमारे | पोस्टे.रामटेक |
| २५ | मनापोशि/१००९ पुनम ब्रिजेश त्रिपाठी | पो.मु |
| २६ | नापोशि/२४१ नितेश लक्ष्मीनारायण रोकडे | पोस्टे.कन्हान |

| | | |
|---|---|---|
| २७ | नापोशि/४१४ शैलेश राजाराम वराडे | पोस्टे.कन्हान |
| २८ | नापोशि/५७० शेख अजाम शेख रशीद सौदागर | स्थागुशा. अंगुली मूद्रा |
| २९ | मनापोशि/६५२ सिमा धनराज लिल्हरे | पो.मु |
| ३० | पोशि/९३६ योगेश हरिचंद्र राजगीरे | पो.मु |
| ३१ | पोशि/७५० प्रफुल्ल अनिल गणवीर | पोस्टे.सावनेर |

**चालक पोलीस अंमलदार**

| अ.क्र. | पोलीस अंमलदाराचे नाव, पदनाम व बक्क्ल नंबर | नेमणुक |
|---|---|---|
| १ | चासफौ/१६५३ प्रविण देवीदास वाट | पोस्टे.कुही |

# भाग –2 (रजा,वेतननिश्चती)

१) क.पोअ/नाजिग्रा/डी–4/सुधारीत वेतन निश्चिती–बासोडे/5127/2025 नागपूर दिनांक :– 19/06/2025

**आदेश**

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक कमांक वेपूर–1209/प्र.क.69/सेवा–9 दिनांक 29/ एप्रील 2009 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम–2009 मधील नियम कमांक 9 व 10 मधील तरतुदी नुसार खालील नमुद पोलीस अधिकारी यांना पुढील प्रमाणे सुधारीत वेतननिश्चिती करण्यात येत आहे.

पोलीस उप निरीक्षक वेतनश्रेणी : - वेतनस्तर- १४ रुपये ३८६००-१२२८०० ग्रेड वेतन ४३००/-

पोउपनि/दिलीप पुसाराम बासोडे

| विद्यमान वेतन व दिनांक | | | | सुधारीत वेतन व दिनांक | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान वेतन बॅन्ड/वेतन श्रेणी मधील वेतन | | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत वेतन ब्रॅन्ड/वेतन श्रेणी मधील वेतन | | |
| | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन | | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन | अभिप्राय |
| 01.07.2013 | 11290 | 2400 | 01.07.2013 | 11290 | 2400 | |
| 04.09.2013 पोहवा पदावर तात्पुती पदो. | 11290 | 2500 | 04.09.2013 पोहवा पदावर तात्पुती पदो. | रू.11290+410 = 11700 पोलीस हवालदार पदोन्नती झाल्याने विकल्पानुसार वेतननिश्चिती 11(1)(ए) प्रमाणे | 2500 | |
| 01.07.2014 | 11710 | 2500 | 01.07.2014 | रू.11700+430=12130 | 2500 | |
| 01.07.2015 | 12140 | 2500 | 01.07.2015 | रू.12130+440=12570 | 2500 | |
| पोलीस हवालदार वेतनश्रेणी 26400–83600 एस–9 मध्ये (दिलेले वेतन) | | | | पोलीस हवालदार वेतनश्रेणी 26400–83600 एस–9 मध्ये (15070 2.57 = 38729.9)( सुधारीत वेतन) | | |
| दिनांक | मॅट्रीक्स स्तर | वेतन | दिनांक | मॅट्रीक्स स्तर | वेतन | अभिप्राय |
| 01.01.2016 | एस – 9 | 38700 | 01.01.2016 | एस – 9 | 39900 | |
| 01.07.2016 | एस – 9 | 39900 | 01.07.2016 | एस – 9 | 41100 | |
| 01.07.2017 | एस – 9 | 41100 | 01.07.2017 | एस – 9 | 42300 | |
| 01.07.2017 | एस – 9 | 42300 | 01.07.2017 | एस – 9 | 43600 | |
| 21.07.2018 | एस – 10 | 44100 | 21.07.2018 | एस – 10 | 45400 | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| से.अ.आ.प्र.यो. तिसरा लाभ मंजुर झाल्याने | | | से.अ.आ.प्र. यो. तिसरा लाभ मंजुर | | | |
| 01.07.2019 | एस – 10 | 46800 | 01.07.2019 | एस – 10 | 49600 | |
| 01.07.2020 | एस – 10 | 48200 | 01.07.2019 | एस – 10 | 51100 | |
| 03.06. 2021रोजी पोउपनि पदाची पदोन्नती झाल्यामुळे | एस – 14 | 49600 | 03.06. 2021रोजी पोउपनि पदाची पदोन्नती झाल्यामुळे | एस – 14 | 53500 | |
| 01.07.2022 | एस – 14 | 51900 | 01.07.2022 | एस – 14 | 55100 | |
| 01.07.2023 | एस – 14 | 53500 | 01.07.2023 | एस – 14 | 56800 | |
| 01.07.2024 | एस – 14 | 55100 | 01.07.2023 | एस – 14 | 58500 | |
| 01.07.2025 | एस – 14 | 56800 | 01.07.2025 | एस – 14 | 60300 | |

**2)क.पोअ/नाजिग्रा/डी–4/सुधारीत वेतन निश्चिती पोउपनि–नलोडे/4841/2025 नागपूर दिनांकः–19/05/2025**

## आदेश

पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्रमांक पोमसं/5/10/अर्हता–2013(पदोन्ती–2013)/109/2023 दिनांक 01/08/2024 अन्वये विशेष पोलीस महानिरीक्षक नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे आदेश क्रमांक विपोमनि/नाप/डि–6/अर्हता–2013 (पदोन्नती–पदस्थापना)– पोउपनि/4335/2024 नागपूर दिनांक 13/08/2024 नुसार या आस्थापनेवर नेमणूक झाल्यामुळे खालील नमुद पोलीस अमंलदार यांची पोलीस उप निरीक्षक या पदावर खालील प्रमाणे दर्शविल्या नुसार या आस्थापनेवर हजर झाल्यामुळे वेतन निश्चिती आदेश या कार्यालयाचे आदेश क्रमांक कपोअ/नाजिग्रा/डी–4 सुधारित वेतन निश्चिती/2024 दिनांक 24/10/2024 रोजी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे. परंतु नमुद आदेश रदद करण्यात येत असून सुधारिता वेतन निश्चितीचे आदेश खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

पोउपनि/ निलीमा अतुलराव नलोडे

| सध्या घेत असलेले वेतन | | सुधारीत करून देय ठरणारे वेतन | |
|---|---|---|---|
| रू.49000 एस 09 | दि. 1.07. 2024 | रू.51900 एस 14 | दि. 21.08.2024 रोजी पोउपनि पदोन्नती |
| रू.50500 एस 09 | दि.21.08. 2024 पदोन्नतीवर | | |

सदरहु वेतन निश्चिती ही वेतन पडताळणी पथकाकडुन होण्या–या वेतन निश्चितीच्या तपासणीच्या अधीन राहुन करण्यात येत असून शासन परिपत्रक,वित्त विभाग क्रमांक संकीर्ण –2021/प्र.क्रं. 52/सेवा–3 दिनांक 22.11.2021 अन्वये अटि व शती नुसार भविण्यात अतिप्रधान झाल्याचे निर्देशनास आल्यास अतिप्रदान वसुल करण्याबाबतचे संबधित पोलीस अधिकारी यांनी हमीपत्र दिलेले आहे.

सदरहु वेतन निश्चिती ही वेतन पडताळणी पथकाकडुन होण्या–या वेतन निश्चितीच्या तपासणीच्या अधीन राहील. व अशा वेतन पडताळणी पथकाकडुन होण्या–या तपासणी नुसार केलेल्या वेतन निश्चिीती मध्ये बदल अपेक्षित असल्यास /झाल्यास (वेतन पुननिश्चितीमुळे ) पुर्वीच्या वेतन निश्चितीप्रमाणे जादा झालेले वेतन व भत्ते त्याचप्रमाणे अदा झालेले फरकाच्या जादा रक्कमेची वसुली करण्यांत येईल.

# भाग —३ (कसुरी,शिक्षा)

क्रमांक :— नाजिग्रा/डी—१०/नापोशि—२१४८ कोकोडे/विचौ/अं.आ./५१३२/२०२५— नागपूर दि.१९.०६.२०२५

**आदेश**

**कसुरदारांचे नांव :— नापोशि/२१४८ कांतीलाल कोकोडे,** नेमणुक पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण

**दोषारोप :—** १) अत्यंत बेशिस्तपणा, बेजबाबदारपणा व कर्तव्यच्युतीयुक्त आचारण की, ज्यात आपण पो.स्टे.कुही नागपुर ग्रामिण येथे नेमणुकीस असतांना दिनांक २०/०४/२०२४ ते २७/१२/२०२४ पर्यत एकुण २५२ दिवस कोणतीही पुर्व सुचना न देता अनधिकृत रजेवर होते. रजेवरून हजर होण्याकरीता दि. २७/१२/२०२४ रोजी आमचे आज्ञांकीत कक्षात आले असता आम्ही गैरहजेरीच्या कारणाबाबत विचारणा केली असता आपण कोणतेही समाधानकारक उत्तर दिले नाही.

२) आपण वरिष्ठांना कोणतीही पुर्व सुचना न देता किंवा परवानगी न घेता, तसेच वैद्यकीय कागदपत्रे सादर न करता आपण दिर्घकाळापासुन अनाधिकृतपणे गैरहजर होते तसेच आपण नेहमी गैरहजर राहण्याचे सवयीचे आहात. याबाबत आपणास कर्तव्यावर हजर होणेसाठी ठाणेदार, पो.स्टे.कुही यांनी ०३/०८/२०२३ अन्वये आगामी काळात गणेश उत्सव, ईद ए मिलाद सारखे महत्वाचे बंदोबस्त आहेत त्या करिता कर्तव्यावर हजर होणेबाबत नोटीस दिली होती. तसेच दि. २१/१०/२०२४ अन्वये आगामी विधानसभा निवडणुकीचा महत्वाचा बंदोबस्त असल्याने मनुष्यबळाची आवश्यक आहे. आपणास कर्तव्यावर हजर होण्या करीता नोटीस देवुन सुध्दा आपण कर्तव्यावर हजर झाले नाहीत. यावरून आपले कर्तव्यात कसुरी करण्याची व बेजबाबदारपणाची वृत्ती तसेच कर्तव्याप्रती अनास्था दिसुन येते.

३) आपण यापुर्वी सुध्दा अनधिकृतपणे गैरहजर असल्याने दिनांक ०३/०४/१३ ते १२/०४/१३ पर्यत १० दिवस दिनांक १६/०५/१५ ते ०१/०६/२०१५ पर्यत १७ दिवस, १८/११/१३ ते २१/११/२०१३ पर्यत ४ दिवस दि. ११/११/१५ ते १४/११/१५ पर्यत ०४ दिवस व दि. १५/०१/१९ ते २०/०१/१९ पर्यत एकुण १ दिवस असे एकुण ४१ दिवस अनधिकृतपणे गैरहजर असल्याने सदरचा कालावधी असाधारण रजेत मंजुर करण्यात आलेला आहे. पोलीस दल हे शिस्तप्रिय असुन आपण या दलाचे एक सदस्य असतांना आपले उपरोक्त वर्तन अंत्यत बेशिस्त व बेजबाबदारपणाचे असुन शिस्तप्रिय खात्यास अशोभनिय आहे.

४) या व्यतिरिक्त आपण दिनांक २८/०७/२०२३ ते २८/१२/२०२३ पर्यत एकुण १५५ दिवस कोणतीही पुर्व सुचना न देता अनाधिकृतपणे गैरहजर होते. त्यामुळे याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग, नागपूर ग्रामीण हे आपले घरी आले असता, आपण दारूच्या नशेत होते, तेव्हा आपणास समजविण्याचा प्रयत्न केला, आपण समजण्याच्या स्थितीत नव्हते. यावरून आपण दारू पिण्याचे सवयीचे असुन वरिष्ठ अधिकारी आपणास कर्तव्यावर हजर होण्याबाबत सुचना देत असतांना आपण दारूचे नशेत राहुन वरिष्ठांचे आदेशाची अवहेलना केली. आपल्या या कृत्यामुळे आपले नैतीक अध:पतन झाले आहे.

वरील कसुरीबाबत आपली विभागीय चौकशी करण्यात आली असता विभागीय चौकशी अंती अ.क्र. १ ते ४ वर नमूद दोषारोप पुर्णत:सिध्द झाले असुन व सदर दोषारोप आपणास मान्य असल्याचे विभागीय चौकशी अधिकारी यांनी त्यांचे समारोप अहवालात नमुद केले आहे.

आपणास महाराष्ट्र पोलीस नियम १९५६ (शिक्षा व अपील) मधील नियम—३ अन्वये **" नायक पोलीस शिपाई या पदावरून पोलीस शिपाई या पदावर ०२ वर्षाकरीता पदावनत करणे"** या शिक्षेची कारणे दाखवा नोटीस दि. २८/०५/२०२५ रोजी निर्गमित करण्यात आलेली असुन, सदरची नोटीस आपण दि. ०२/०६/२०२५ रोजी स्वीकारून दिनांक १७/०६/२०२५ अन्वये आपण स्पष्टीकरण सादर केले. सदर स्पष्टीकरणात आपण दारूचे आहारी गेल्याने प्रकृती खुप खराब झाली त्यामुळे मी सन २०२४ विधानसभा निवडणुक काळात बंदोबस्तात हजर होवु शकलो नाही. दारूचे व्यसन वाढल्यामुळे व्यसन मुक्ती केंद्र, भंडारा येथे उपचार घेत असुन प्रकृती बरी होताच कर्तव्यावर हजर येईल असे नमुद केले. सदर स्पष्टीकरणाचे अवलोकन केले असता आपण दिलेले स्पष्टीकरण समाधानकारक नसल्याने कारणे दाखवा नोटीस मध्ये प्रस्तावित केलेल्या शिक्षेत कोणताही बदल न करता खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**अंतिम आदेश**